अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरित करण्यास मान्यता देण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : अपाम- २०२६/प्र.क्र.५४/ई-१६२१९०८/का.१४२५-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० मे, २०२६.

**संदर्भ :-**

(१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६

(२) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे पत्र क्र. APM/ADM/३१/२०२६, दिनांक १०.०४.२०२६

(३) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे पत्र क्र. APM/ADM/१७९/२०२६, दिनांक २४.०४.२०२६

**शासन निर्णय :-**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता रु.७५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित आहे. संदर्भाधीन क्र. (२) येथील पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांनी मागणी केल्यानुसार खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे:

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | उद्दिष्ट | अर्थसंकल्पित अनुदान | या आदेशान्वये वितरित अनुदान |
|---|---|---|---|
| १ | ३२-अंशदाने | ७५०.०० | १५०.०० |

२. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास रु.१५०.०० कोटी (रुपये दीडशे कोटी फक्त) इतका निधी खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे:

१) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादीत ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.

२) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशिलवार माहिती व त्यावर केलेला खर्च यांची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

३) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

४) सदरचा निधी खर्च करताना राज्य शासनाची कार्यनियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पिय नियम पुस्तिकेतील तरतुदी, सर्व अटी व शर्तीचे अनुपालन करुन निधीचा विनियोग करावा. तसेच खर्च करताना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) सदर निधी खर्च केल्यानंतर त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी शासनास व संबंधितांना सादर करण्याची जबाबदारी ही व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांची राहील.

६) सदर प्रयोजनासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च व प्रधान महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाने नोंदविलेला खर्च याचा ताळमेळ घालण्याची कार्यवाही महामंडळाने करावी.

७) सदर निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च न होता बँक खात्यात, स्वीय प्रपंजी खात्यात अथवा शासकीय लेख्याबाहेर ठेवता येणार नाही.

८) तसेच निधी आहरित करुन बँक /स्वीय प्रपंजी खात्यात ठेवला असल्यास असा खर्च न होणारा निधी शासनखाती जमा करण्यात यावा.

३. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास रु.१५०.०० कोटी (रुपये दीडशे कोटी फक्त) आहरित व संवितरित करण्यासाठी “सह सचिव / उप सचिव (का-१४२५-अ), नियोजन विभाग” हे “नियंत्रक अधिकारी” असतील तसेच “कार्यासन अधिकारी (का-१४२२), नियोजन विभाग” हे “आहरण व संवितरण अधिकारी” असतील. सदर अनुदान महाराष्ट्र कोषागार नियमातील विहित नमुन्यातील देयकान्वये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार कार्यासन अधिकारी (का-१४२२), नियोजन विभाग यांना देण्यात येत आहेत.

४. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई यांस सदर आदेशान्वये वितरित करण्यात येणारे अंशदान हे सशर्त अनुदान आहे.

उपरोक्त होणारा खर्च हा सन २०२६-२७ साठीच्या असलेल्या “ओ-१०, ४२५०, इतर सामाजिक सेवा यावरील भांडवली खर्च, ००, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(००)(०१) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. यांस भांडवली अंशदान (कार्यक्रम) (४२५०ए०७२) ३२, अंशदाने या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. २४५/व्यय ८,दि.१५.०५.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ च्या तरतुदीच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२०१४१६५७३३१६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department, 2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.05.20 14:18:18 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास,गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई

४. मा.उपमुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
५. सचिव, नियोजन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपुर
८. व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मर्या.,मुंबई
९. सह / उप सचिव, वित्त विभाग, (कार्यासन व्यय-८/अर्थ-३ )
१०.सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई
११.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
१४.कार्यासन १४२२ /१४२४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती कार्यासन १४२५-अ